महाज्योती
ज्ञानदीप समतेचा
सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022**

**दुरध्वनी क्रं.** 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 **ई मेल -** mahajyotingp@gmail.com

**जा.क्र. महाज्योती/नागपूर/आस्था/**1341/2025-26 **दिनांक-** 25/04/2025

# संघ लोकसेवा आयोग- केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (Assistant Commandant) मुख्य परीक्षा- 2024 उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व चाचणी/ मुलाखत परीक्षेकरीता अर्थ सहाय्य योजनेचा तपशील

महाराष्ट्र राज्यातील इतर मागासवर्ग विमुक्त जाती-भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील जे विद्यार्थी संघ लोकसेवा आयोग- केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (Assistant Commandant) मुख्य परीक्षा- 2024 उत्तीर्ण झालेले आहेत अशा विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व चाचणी/मुलाखत परीक्षेकरीता एकरकमी अर्थ सहाय्य प्रदान करण्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

**योजनेच्या लाभासाठी पात्रता** :-

1. विद्यार्थी महाराष्ट्रातील रहिवासी असावा.
2. त्याचप्रमाणे नॉन क्रिमीलेअर गटातील इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती - भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गापैकी असावा.
3. विद्यार्थी हा संघ लोकसेवा आयोग- केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (Assistant Commandant) मुख्य परीक्षा- 2024 उत्तीर्ण झालेला असावा. ज्या विद्यार्थ्यांना सदर परीक्षेकरीता इतर संस्था/सारथी, पुणे यांचेकडून अर्थसहाय्य मिळत असल्यास अशा विद्यार्थ्यांना सदर योजनेच्या लाभासाठी ग्राह्य धरल्या जाणार नाही.

**अर्ज करण्यासाठी आवश्यक वैयक्तिक कागदपत्रे** :-

1. आधार कार्ड (पुढील व मागील बाजुसहित)
2. जातीचा प्रमाणपत्र (Caste Certificate)
3. वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate)
4. संघ लोकसेवा आयोग- केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (Assistant Commandant) मुख्य परीक्षा- 2024 चा प्रवेश पत्र
5. संघ लोकसेवा आयोग- केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (Assistant Commandant) मुख्य परीक्षा- 2024 उत्तीर्ण झालेल्या निकालाची प्रत (बैठक क्रमांक ठळक करून देण्यात यावा.)

**अर्ज कसा करावा**:-

1. महाज्योती www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील **"Application Invited For Financial Assistance Those Who Qualified For, UPSC Central Armed Police Forces (Assistant Commandant) Personality Test/ Interview- 2024"** यावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.
2. अर्जासोबत तपशीलात नमुद सर्व कागदपत्रे स्वाक्षांकीत करून स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन जोडावे.

**अटी व शर्ती** :

1. अर्ज करण्याचा अंतीम दि.02/05/2025 आहे.
2. पोस्टाने किंवा ई-मेल व्दारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.
3. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, अर्ज नाकारणे व स्विकारणे याबाबतचे सर्व अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती यांचे राहतील.
4. कोणत्याही माध्यमातुन व अंतीम निवड प्रक्रियेच्या टप्प्यावर विद्यार्थ्यांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याचे आढळल्यास तो/ती कायदेशीर कार्यवाईस पात्र राहील.
5. विद्यार्थाचे बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न असणे आवश्यक आहे.
6. अर्ज भरतांना कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचणी आल्यास महाज्योतीच्या Call Centre वर संर्पक करावा किंवा ईमेलवर संपर्क साधावा.

   **संर्पक क्रमांक** :- 0712-2870120/07122870121

   E-mail Id:- mahajyotihelpdesk@gmail.com

(स्वा.)
(प्रशांत वावगे)
**व्यवस्थापकीय संचालक**,
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,
(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर.